भतवाल हॉस्पिटल म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२७५ ■ बुधवार ८ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26


बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## महाबळेश्वरमध्ये शंभर वर्षांतील विक्रमी पाऊस
## पावसामुळे गोवा महामार्गाची वाहतूक तीस तास ठप्प



**सातारा, दि. ७ : राज्यात मराठवाडा वगळता विविध विभागात जोरदार पाऊस सुरू असून मुंबई उपनगरात पावसामुळे शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. तर, पश्चिम महाराष्ट्रातही मुसळधार पाऊस पडत असून सातारा जिल्ह्यात गेल्या चोवीस तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात पावसाने अक्षरशः कहर केला असून महाबळेश्वरमध्ये गेल्या २४ तासांत तब्बल ५१३ मिलीमीटर म्हणजेच २० इंच इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे यंदाचा हा पाऊस शतकातील सर्वाधिक पावसांपैकी मानला जात आहे. दरम्यान, कोकण आणि रायगड जिल्ह्यात गेल्या दिवसांपासून सुरू असलेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची पूर्णपणे दाणादाण उडाली आहे. पावसामुळे तीस तासांहून अधिक काळापासून या महामार्गावरील संपूर्ण वाहतूक ठप्प झाली. त्यामुळे रायगड जिल्ह्याची एकप्रकारे नाकाबंदी झाली.**

यंदा चोवीस तासातील पावसाने सातारा जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगरी भागातील जनजीवन विस्कळीत झाले. महाबळेश्वरमध्ये अनेक ठिकाणी पाणी साचून दरडी कोसळल्या आहेत. रस्ते खचले, झाडे उन्मळून पडली, वीजपुरवठा खंडित झाला आणि अनेक गावांचा संपर्क तुटला. घाटरस्त्यांवर मातीचे ढिगारे आणि दगड आल्यामुळे गावांचे संपर्क तुटले. वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. महाबळेश्वरमध्ये ५१३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. ही सातारा जिल्ह्यातील आतापर्यंतच्या सर्वाधिक पावसाच्या नोंदींपैकी एक ठरली आहे. दरम्यान, या विक्रमी पावसामुळे प्रशासन सतर्क झाले. (पान ४ वर)

## त्र्यंबकेश्वर नाशिकला ढगफुटी झालीच नाही

नाशिक, दि. ७ : जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वरसह अनेक भागांमध्ये धुवाधार पावसाने झोडपले. मात्र, नाशिकमध्ये ज्या ढगफुटीसदृश पावसाचा अंदाज व्यक्त केला जात होता, तसा पाऊस कुठेही झाला नसल्याचे समोर आले. नाशिकमध्ये सर्वाधिक पाऊस हा इगतपुरीमध्ये झाला असून त्र्यंबकेश्वरमध्येही चांगला पाऊस झाला. सरकार तर्फे सांगण्यात आल्यानुसार जवळपास ३०० मिलिमीटर पाऊस मात्र कुठेही झाला नाही. मोठी आपत्ती टळल्याचे समाधान आहे. मात्र, सरकार आणि हवामान खात्याचे भाकित चुकल्याचेही सत्य नाकारता येणार नाही.

मंगळवारी (७ जुलै) नाशिकमध्ये ढगफुटीची शक्यता वर्तवण्यात आली होती. नाशिकमध्ये इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर यासह काही भागात अंदाजे ३०० (पान ४ वर)

## वाहनचालक परवान्यासाठी नवीन नियम लागू
## महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य केले

**मुंबई, दि. ७ : राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी एक ऑगस्ट पासून नवीन नियमावली लागू करण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते.**

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राज्यात



सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या क्षेत्राचे नियमन करून राज्याला महसूल मिळावा आणि तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासन नियोजन करत आहे. या नव्या व्यवस्थेनुसार बाईक टॅक्सी चालकांकडून दररोज पाच रुपये महसूल जमा करण्यात येणार आहे. प्रत्येक राईडमागे दोन रुपये कल्याण निधीसाठी जमा करणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे किंवा चुकीच्या पद्धतीने वाहन चालविणाऱ्यांवर परिवहन विभागाकडून कठोर दंडात्मक कारवाई केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियमांमध्ये महिला, विद्यार्थी आणि अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. बाईक टॅक्सी चालकाकडे मोटार वाहन अधिनियम नुसार वैध वाहनचालक परवाना, तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियमाच्या नियमानुसार सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे अधिकारपत्र (बॅज) असणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा बॅज देण्यापूर्वी अर्जदाराची पोलिस विभागामार्फत चारित्र्य पडताळणी करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियमानुसार (पान ४ वर)

## मिसिंग लिंक धोकादायकच; भ्रष्टाचाराचे त्रयस्थांमार्फत ऑडिट करा- गाडगीळ

**पुणे, दि.७ - डोंगराळ भागात रस्त्यासाठी कुठलाही बोगदा खणला कि त्याच्या अंतर्गत भागास मजबुती येण्याकरिता काँक्रीटचे जाडे लायनिंग केले जाते. हे लायनिंग जर चुकीचे व निकृष्ट झाले तर पावसाळ्यात डोंगरातून झिरपणाऱ्या पाण्याचा जोर वाढल्यास काँक्रीटचे लायनिंग निकामी ठरू शकते. आज सोशिअल मीडियावर दिसणाऱ्या फोटोतून हि बाब स्पष्ट होत आहे असे, काँग्रेसचे वरिष्ट प्रवक्ते व आर्कीटेकट् अनंत गाडगीळ यांनी पत्रकात म्हंटले आहे.**

दुसरे म्हणजे, युरोपियन स्टँडर्ड प्रमाणे परदेशात अशे बोगदे-मार्ग तयार केल्यावर किमान १० ते १२ महिने त्याची चाचणी केली जाते, उणीवा दुरुस्त केल्या जातात व त्यानंतरच असे मार्ग जनतेसाठी खुले केले जातात. परंतु युती सरकारने घिसाडघाईने केलेल्या उद्घाटनामुळे बांधकाम सुरक्षिततेच्या बाबींचे सर्वेक्षणच केले गेलेले दिसत नाही म्हणून आज हि परिस्थिती उद्भवली आहे. मुंबई-पुणे नियमितपणे प्रवास करणारे टॅक्सीचालक मिसिंग लिंकचा वापर करण्यास घाबरत आहेत. संपूर्ण ९-१० किलोमीटर मध्ये नैसर्गिक झीद्र (ओपेनिंग ) सोडता येईल असा मार्ग निवडायला पाहिजे होता.

याशिवाय अवघ्या ९-१० कि मी ला तब्बल १२ ते १३ हजार कोटी खर्च आल्याचे सांगितले जात आहे. राज्य सरकारने याची फोड करणारा तपशील जाहीर करावा म्हणजे जनतेच्या पैशाची हि लूट आहे याबाबतची खरी वस्तुथिती जनतेसमोर येईल अशी मागणी गाडगीळ यांनी केली आहे.

मिसिंग लिंक मधून केलेल्या आपल्या पहिल्याच प्रवासानंतर, आपण मंत्रालयातील वार्ताहर कक्षामधील काही (पान ४ वर)

## शहादा परिसरात पाऊस नसल्याने शेतकरी चिंतेत; नद्या सर्वत्र कोरड्या

**शहादा, दि.०७(का.प्र.) - राज्यात सर्वदूर पर्जन्य राजाचे जोरदार आगमन झाले असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. खान्देशातील तापी नदीसह अनेक उपनद्यांना पूर आले आहेत. असे चित्र एकीकडे असताना, शहादा व परिसरात मात्र परिस्थिती याउलट पाहायला मिळत आहे.**

मंगळवारी शहादा व परिसरातील गावांना पावसाने पुन्हा एकदा हुलकावणी दिली. आभाळ पूर्णपणे भरून आल्यानंतरही दिवसभरात केवळ किरकोळ पावसाच्या धारा कोसळल्या. जोरदार पावसाने हजेरी लावली नसल्याने बळीराजासह सर्वसामान्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहेत.

शेजारच्या धुळे जिल्ह्यातही हवामान खात्याकडून पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला होता, आणि त्यानुसार तिथे पाऊसही झाला. मात्र नंदुरबार जिल्ह्यातील शहादा शहर व परिसरात ढग भरून येऊनही अपेक्षित पाऊस कोसळत नसल्याने पावसाची प्रतीक्षा कायम आहे. गत तीन दिवसांपासून राज्यात (पान ४ वर)

## लाभ क्षेत्राचा दाखला स्थानिक स्तरावरच देण्याची अभिजीत पाटील यांची मागणी

**शहादा,दि.७(प्रतिनिधी)- लाभ क्षेत्राचे दाखले वेळेत उपलब्ध व्हावेत तसेच अंतिम मंजुरीसाठी धुळे कार्यालयात पाठविण्याऐवजीप्रकाशा/शहादा पाटबंधारे उपविभाग स्तरावरच दाखले देण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी अशी मागणी शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नगराध्यक्ष श्री पाटील यांनी म्हटले आहे की, नंदुरबार जिल्ह्यातील तसेच सारंगखेडा, प्रकाशा, शहादा व परिसरातील शेतकऱ्यांना जमीन खरेदी-विक्री, पीककर्ज, बँक व्यवहार तसेच



विविध शासकीय कामांसाठी लाभ क्षेत्राचा दाखला आवश्यक असतो. मात्र हा दाखला मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रकाशा किंवा शहादा पाटबंधारे उपविभाग कार्यालयात अर्ज करावा लागतो आणि अर्ज केल्यानंतरही दाखला मिळण्यासाठी २१ ते ३० दिवस, तर काही वेळा त्याहून अधिक कालावधी लागतो. (पान ४ वर)

## तीनसमाळ घाट मार्ग वाहतुकीसाठी खुला

नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी) - मुसळधार पावसामुळे तीनसमाळ घाटात दरड कोसळल्याने काही काळ वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. प्रशासनाने तातडीने यंत्रणेला कामाला लावून दरड व माती हटवून रस्ता सुरक्षित केला. त्यानंतर घाटमार्ग वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला आहे.

या घटनेत कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, घाट परिसरातून प्रवास करताना वाहनचालकांनी सावधगिरी बाळगावी, असेही सांगितले आहे. पावसाची परिस्थिती लक्षात घेता संबंधित यंत्रणा सतर्क असून घाट परिसरावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

## गोमाई पुलावरील बंदीचे उल्लंघन केले गुजरातच्या पिकअप चालकावर गुन्हा

**नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- शहादा शहरातील गोमाई नदीवरील पुलावर अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी असतानाही आदेशाचे उल्लंघन करून पुलावरून महिंद्रा पिकअप वाहन नेल्याप्रकरणी गुजरातमधील चालकाविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ०५/०७/२०२६ रोजी रात्री २२:१५ वाजेच्या सुमारास गोमाई नदी पुलावर महिंद्रा पिकअप (क्र. जी.जे.-१९-४७२७७) हे वाहन चालक सावनकुमार उमेश चौधरी (वय २७), रा. चौधरी फलिया, हलदवा, ता. महुवा, जि. सुरत (गुजरात) याने व्यारा येथून इंदोरकडे नेत असताना पुलावरील अवजड वाहनबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

जिल्हाधिकारी डॉ मित्ताली सेठी यांच्या आदेशानुसार गोमाई नदी पुलावरून अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी आहे. संबंधित चालकाने हा आदेश मोडून पुलावरून वाहन नेले. तसेच पुलाच्या प्रवेशद्वारावरील लोखंडी उंची मर्यादा कमान व सावधान, कमकुवत पूल अवजड वाहनांसाठी वाहतूक बंद असा इशारा देणाऱ्या शासकीय फलकाचेही नुकसान केल्याचा आरोप आहे. (पान ४ वर)


## रेल्वे प्रवाशास लुटणाऱ्या दोघांना मुद्देमालासह अटक

धुळे, दि.७ - दोंडाईचा (ता.शिंदखेडा) रेल्वे स्थानकावर परप्रांतीय मजुरास चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या दोघांना दोंडाईचा पोलिसांनी तत्काळ अटक केली. दोघांकडून चोरीचे सहा मोबाईल, रोकड जप्त करण्यात आली, अन्य गुन्हेही उघडकीस येण्याची शक्यता आहे.

छत्रपाल रामप्रीत चव्हाण (वय३४ , रा. मीरपुर नवाबगंज, जि. बारबंकी, उ. प्रदेश) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दुसऱ्या दिवशी रविवारी (ता.)दोंडाईचा पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला. दोंडाईचा रेल्वे स्थानक परिसरात दोन चोरटयांनी चाकुचा धाक दाखवून शनिवारी रात्री उशिरा मारहाण केली. मोबाईल, तीन हजारांची रोकड असा एकुण (पान ४ वर)

## सत्तावन्न ह. थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित महावितरणकडून वीजबिल वसुली मोहिमेस वेग

**धुळे, दि.७- परिमंडलातील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील सुमारे दोन लाख ग्राहकांकडे थकीत १७७ कोटी रुपयांच्या वीजबिल वसुलीसाठी महावितरणने धडक मोहीम सुरू केली आहे. मागील जून महिन्यात वीजबिल थकबाकीमुळे ५७ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता आणि संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर त्यांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. तरी ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडित होण्याची कारवाई टाळावी, असे आवाहन**



**महावितरणने केले आहे.**

जळगाव परिमंडलात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील एकूण १ लाख ८७ हजार ५२४ ग्राहकांकडे १७७ कोटी ६९ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. यापैकी जळगाव मंडलातील १ लाख ८ हजार ६२४ ग्राहकांकडे ९६ कोटी ५७ लाख, धुळे मंडलातील ५६ हजार ७७६ ग्राहकांकडे ६० कोटी ६६ लाख व नंदुरबार मंडलातील २२ हजार १२४ ग्राहकांकडे २० कोटी ४७ लाख रुपयांची थकबाकी आहे.

थकबाकी वसुलीसाठी जळगाव परिमंडलातील जळगाव, धुळे व नंदुरबार मंडलात महावितरणतर्फे धडक वसुली मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, शाखा अभियंते, तांत्रिक कर्मचारी या मोहिमेत प्रत्यक्ष ग्राहकांकडे भेट देऊन थकबाकी वसुलीसाठी सरसावले आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. (पान ४ वर)

## धुळ्यात दोघा भावंडांवर चौघांचा चाकुने हल्ला

धुळे, दि.७ - शहरातील मालेगाव रोडवरील रेल्वे क्रॉसिंग सम्राट हॉटेलसमोर चार जणांनी दोघां भावंडांवर तीक्ष्ण हत्याराने हल्ला चढवला. त्यात दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्न सर्वोपचार रुग्णालयामध्ये दाखल केले. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

मनतोश ताराप्रकाश यादव (२९), युवराज यादव (दोघे रा. मारोती नगर, चाळीसगाव रोडजवळ, धुळे) पाच जुलैस रात्री साडेदहाला दोघे मालेगाव रोडने जात होते. रेल्वे क्रॉसिंगजवळील सम्राट हॉटेलसमोर संशयीत चौघांनी त्यांची अडवणूक केली. शिवीगाळ, दमदाटी(पान ४ वर)



## नरव्हाळ येथे दफनभूमीसाठी जागा द्या नरव्हाळच्या आदिवासींचे निवेदन

**धुळे, दि.७- तालुक्यातील ग्रामपंचायत नरव्हाळ गावातील आदिवासी (भिल्ल) समाजासाठी स्वतंत्र दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून ती ७/१२ उताऱ्यावर नोंद करण्याची मागणी आदिवासी टाईगर सेना धुळे जिल्ह्याच्या वतीने धुळे तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, येथे आदिवासी (भिल्ल) समाजाची लोकसंख्या एक हजारांहून अधिक असूनही समाजासाठी आजपर्यंत स्वतंत्र दफनभूमीची व्यवस्था करण्यात आलेली नाही. यापूर्वीही ३१ डिसेंबर २०२१,२७ मार्च २०२३ आणि २० जानेवारी २०२६ रोजी तसेच ग्रामपंचायतीमार्फत संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला होता.मात्र अद्यापही दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याची खंत व्यक्त (पान ४ वर)

## गायकवाड चौकाजवळ पूर्ववैमनस्यातून हल्ला

धुळे, दि. ७ (प्रतिनिधी) : शहरातील गायकवाड चौकाजवळ पुर्ववैमनस्यातून सशस्त्र हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. अमोल रावसाहेब कुशारे (रा. कलामंदिर, पारोळा रोड, धुळे) रविवारी दुपारी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून वरखेडी रोडने गायकवाड चौकाकडे जात होते. त्यावेळी प्रकाश अहिरे, निलेश देवरे यांच्यासह अन्य दोघांनी त्यांना अडविले आणि त्यांच्यावर सशस्त्र हल्ला केला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, (पान ४ वर)



## वाघाडीत रेल्वे भूसंपादन तणाव मोबदला स्वतंत्र खात्यावरच द्यावा

धुळे, दि. ७ (प्रतिनिधी) - जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील वाघाडी येथे रेल्वे मार्गासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या जमिनीचा ताबा घेण्यासाठी प्रशासन, रेल्वे अधिकारी आणि पोलिसांचा फौजफाटा मंगळवारी गावात दाखल झाला. मात्र, मोबदल्याच्या वाटपाबाबत वाद निर्माण झाल्याने जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया पुन्हा एकदा रखडली.

शेतकरी अनिल रमण पवार यांनी सांगितले की, ते आणि भारती खैरनार हे दोन स्वतंत्र खातेदार आहेत. भूसंपादन विभागाने मोबदल्याची रक्कम न्यायालयात वर्ग केली आहे. दोन्ही खातेदारांचा मोबदला त्यांच्या-त्यांच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी मंडळ अधिकारी आणि रेल्वे प्रशासनाकडे केली. अनिल पवार यांनी स्पष्ट भूमिका घेत, माझ्या जमिनीचा मोबदला माझ्या खात्यात आणि माझ्या बहिणीचा मोबदला तिच्या खात्यात जमा झाल्याशिवाय मी शेतीचा ताबा देणार नाही, असे सांगितले. शेजारच्या शेतातील(पान ४ वर)

## नवापूर, तळोदा परिसरात पावसाची जोरदार हजेरी; शेतकऱ्यांना दिलासा

**नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर व तळोदा तालुक्यात सोमवारी मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर झालेल्या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून खरीप पेरण्यांना वेग येण्याची आशा निर्माण झाली आहे.**

नवापूर तालुक्यात सकाळपासून सुरू झालेल्या पावसाने शेतशिवार तुडुंब झाले. शेतकरी पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना लागले असून हा पाऊस खरीप हंगामासाठी पोषक ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

दरम्यान, तळोदा शहरात काही तास झालेल्या मुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचले. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांची काही काळ गैरसोय झाली. नागरिकांनी प्रशासनाकडे पाणी निचऱ्याची व्यवस्था अधिक प्रभावी करण्याची मागणी केली आहे. जिल्ह्यातील शहादा, अक्कलकुवा, धडगाव व नंदुरबार (पान ४ वर)

## चंपत राय व अनिल मिश्रांच्या घरावर बुलडोझर कधी चालवणार?-सपकाळ



**मुंबई/नाशिक, दि.७- अयोध्येमध्ये सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने प्रभू रामाचे मंदिर बांधण्यात आले, त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत या मंदिराच्या विश्वस्त मंडळाची घोषणा केली. या विश्वस्तांमध्ये भाजपा, आरएसएस व मोदींच्या खास लोकांना नियुक्त केले व या ट्रस्टला आरटीआयच्या कक्षेतून बाहेर ठेवले. जगभरातील कोट्यवधी भक्तांनी मोठ्या श्रद्धेने प्रभूरामचरणी दान व देणगीच्या स्वरुपात अब्जावधी रुपये अर्पण केले, सोने चांदीच्या विटा, आभुषणे अर्पण केली पण या रामधनावर विश्वस्त मंडळाने दरोडा टाकला. या दरोड्याची सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशांमार्फत चौकशी करून आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा करा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.**

प्रभू रामाला लुटणाऱ्या प्रवृत्तींविरोधात काँग्रेस पक्षाने राज्यभर रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आयोजित केला असून याची सुरुवात नाशिकच्या काळाराम मंदिरातून करण्यात आली. (पान ४ वर)

## किरकोळ कारणावरून तरुणाला मारहाण

धुळे, दि. ७ (प्रतिनिधी) शहरातील रामदेव बाबा नगर परिसरात क्षुल्लक कारणावरून तिघांनी तरुणाला शिवीगाळ केली. त्याचवेळी लाकडी दांड्याने मारहाण केली. याप्रकरणी आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. वाहिद गफूर शेख (रा. रामदेव बाबा नगर उस्मानिया मशीद जवळ, धुळे) असे जखमीचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित अफसर अन्सारी, पापा अन्सारी, शाएन अन्सारी (सर्व रा. मौलवीगंज, बाबा नगर, धुळे) यांनी किरकोळ कारणावरून वाद घातला. वाहिद यास शिवीगाळ करून लाकडी दांडा आणि वस्तूने मारहाण केली, ठार मारण्याची (पान ४ वर)

## हस्ती बँक सोनगीरची यशस्वी वाटचाल वर्धापन दिनासाठी मान्यवरांची उपस्थिती



सोनगीर, दि.७ - दि हस्ती को-ऑप बँक लि. सोनगीर शाखेचा ३४ वा वर्धापन दिवस शुक्रवार दिनांक ३ जुलै २०२६ रोजी ग्राहक जागरूकता मेळावा व सोबत मोफत नेत्र तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व. हस्तीमलजी जैन द्वारा स्थापन झालेल्या व बँकेचे आधारस्तंभ स्व. कांतीलालजी जैन यांनी समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून बँकेचे अध्यक्ष कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हस्ती बँकेतर्फे दरवर्षी समाज हितासाठी विविध उपक्रम बँकेमध्ये राबवले जातात.

या शाखा वर्धापन प्रसंगी वर्धापन दिनाचे उद्घाटन सोनगीर पोलीस स्टेशन चे ए. पी. आय. तुषार देवरे सर याच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच रक्तदान शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती, धुळे मा. सदस्य अविनाश महाजन यांच्या शुभहस्ते करण्यात आले. मोफत नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन रमणिक जैन व सदस्य शरद पाचपुते यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या मोफत नेत्र तपासणी शिबिरात कांता लक्ष्मी शहा नेत्र रुग्णालय, नंदुरबार येथील नेत्र तज्ञ डॉ. तुषार देवरे यांनी सोनगीर व परिसरातील गरीब व गरजू (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,32,850 रु.+3% GST
सोने- 24 K -1,45,000 रु.+3% GST
चांदी- 2,33,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## एल निनो, काळजी आणि पावसाचा कहर

एकिकडे तज्ज्ञांनी आणि सरकारने विज्ञानाच्या आधारे एल निनो चा संभाव्य धोका आणि त्यामुळे येणारा दुष्काळ या संबंधीचा इशारा दिला होता.मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा उहापोह तसेच सावधगिरी बाबत चर्चा झाली होती.लोकांच्या मनात विशेषत: शेतकरी वर्गाच्या मनाने मोठा धसका घेतला होता.परंतु हे सगळे तसेच हवामानाचे अंदाज खोटे ठरवत अर्ध्याहून अधिक महाराष्ट्रात आणि देशातही पावसाने कहर केला आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पार कोलमडून पडली आहे.मुंबई पुणे रस्ता वाहतूक,रेल्वे, मुंबई गोवा वाहतूक खोळंबली अनेक रेल्वे गाड्या रद्द झाल्या किंवा पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्या परिणामी नियमित रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली.पश्चिम महाराष्ट्रात सांगली,सातारा कोल्हापूर जिल्ह्यातील पाऊस थांबायला तयार नाही.महाबळेश्वरला शंभर वर्षांचे रेकार्ड पावसाने तोडले

मुंबई सह कल्याण ठाणे भिवंडी भागात पाणीच पाणी आहे.विधानसभेचे कामकाज तहकूब करावे लागले कारण अनेक आमदार अर्ध्या रस्त्यातून परत गेले किंवा अडकले. हा वेगळाच इतिहास म्हणावा लागेल.दरडी कोसळल्या , मुंबईत असंख्य झाडे त्यांचा जीव गुदमरल्याने उन्मळून पडली.सीमेंटच्या रस्त्यांचे वेड लागल्याने झाडांची वाढ किंवा पोषण थांबले.काही जीव गेले.तरीही तथाकथित विकासाचे पोवाडे गाणे चालूच आहे.मनुष्य वस्ती उध्वस्त होत असताना त्याबरोबरच त्यांचे जगणे असह्य होत असताना अशा विकासाचा सोस कशासाठी असे प्रश्न तयार झाले असले तरी त्याचे उत्तर देण्याची कुणाचीच तयारी नाही.राज्याच्या प्रमुखांना खुलासा करावा लागतोय की,पहिल्या पावसाची टेस्टींग झाली आता दुरूस्ती होईल. पण सात हजार कोटी रूपये खर्च करून मिसिंग लिंकची टेस्टिंग होत असेल तर यापेक्षा दुसरा विनोद होऊ शकत नाही असे लोकांचे म्हणणे आहे.एकूणच कंत्राटदार लॉबी,सरकारी यंत्रणा यांच्यातील बांधकामांच्या विशेषत: रस्त्यांच्या बांधकामातील लागेबांधे उघड झाले आहेत.यातील जनतेच्या हातात काहीच नाही.मुकाटपणे बघणे आणि सहन करणे या पलिकडे सामान्य जन काहीच करू शकत नाहीत.

पाऊस मात्र उगाचच बदनाम होतो. वास्तवात त्याचे येणे शुभंकर आहे.अतिवृष्टी काही आजची नाही.तो माणसाच्याच निसर्गाशी बेगुमानपणे वागण्याच्या परिणामांचाच भाग आहे.मात्र कोणीही या संदर्भात समजून घेण्यास तयार नाही.उध्वस्त होणे यालाच विकास मानण्याची मानसिकता तयार होत आहे.ही बाब निकोप प्रशासन आणि व्यवस्थेच्या दृष्टिने निश्चितच ठिक नाही.पावसाने एकिकडे प्रचंड नुकसान झालेले असताना दुसरीकडे विदर्भ आणि खान्देशातील धुळे नंदुरबार जिल्ह्यातील पेरण्या खोळंबल्या आहेत.तिकडे पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे.तापी नदी दुथडी भरून वाहत असली तरी ती ज्या प्रदेशातून वाहत जाते तो परिसर कोरडा आहे.अशा प्रकारे पाऊस असंतुलित आहे.

यंदाच्या पावसाने हवामानविषयक अनेक अंदाज आणि दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. काही महिन्यांपूर्वी एल निनोच्या परिणामामुळे दुष्काळाची शक्यता वर्तवण्यात आली होती. तज्ज्ञ, हवामान विभाग आणि सरकारनेही संभाव्य पाणीटंचाईबाबत इशारे दिले होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीतही या विषयावर सविस्तर चर्चा झाली होती. त्यामुळे विशेषत: शेतकरी वर्गाच्या मनात मोठी भीती निर्माण झाली होती.परंतु प्रत्यक्षात चित्र पूर्णपणे उलटे दिसत आहे. महाराष्ट्रासह देशाच्या मोठ्या भागात पावसाने अक्षरश: कहर केला आहे. मानवी वस्त्या उद्धस्त होत असताना, सामान्यांचे जगणे असह्य होत असताना, अशा विकासाची किंमत नेमकी कोण मोजत आहे, हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे येतो. मात्र त्याचे उत्तर देण्याची तयारी सत्ताधाऱ्यांपासून प्रशासनापर्यंत कुणाकडेही दिसत नाही.

या सगळ्या परिस्थितीत पावसालाच दोष देण्यात आपण धन्यता मानतो.वास्तविक पाऊस हा जीवनदायी आहे. अतिवृष्टी ही काही आजची घटना नाही. हवामानातील बदल, नद्यांची गुदमरलेली पात्रे, डोंगरांची बेसुमार कत्तल, जंगलांचा ऱ्हास, सिमेंटीकरण आणि निसर्गाशी केलेली बेफिकीर छेडछाड यांचेच हे दुष्परिणाम आहेत. पावसाला दोष देण्यापेक्षा विकासाच्या विद्यमान मॉडेलचा गंभीरपणे पुनर्विचार करण्याची गरज आहे.

एका भागात महापूर आणि दुसऱ्या भागात पावसाची प्रतीक्षा, हेच आजच्या मान्सूनचे वास्तव आहे. ही असंतुलित परिस्थिती हवामान बदलाचे तसेच मानवनिर्मित पर्यावरणीय असमतोलाचे गंभीर संकेत देत आहे.

आज गरज पावसाला दोष देण्याची नव्हे, तर विकासाच्या नावाखाली निसर्गाशी सुरू असलेल्या संघर्षाला थांबवण्याची आहे. अन्यथा उद्धस्त होत जाणाऱ्या व्यवस्था आणि विस्कटत जाणारे जनजीवन यालाच विकास समजण्याची मानसिकता अधिक बळावेल. कोणत्याही सुदृढ प्रशासनासाठी आणि लोकाभिमुख व्यवस्थेसाठी ही निश्चितच धोक्याची घंटा आहे.निष्कर्ष एवढाच की, पाऊस हा शत्रू नाही; तो निसर्गचक्राचा अविभाज्य आणि जीवनदायी भाग आहे. खरा प्रश्न आहे तो निसर्गाचे नियम धाब्यावर बसवून उभारल्या जाणाऱ्या विकासाच्या संकल्पनेचा. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर निसर्गाशी सुसंवाद साधणारे नियोजन, शाश्वत विकास आणि उत्तरदायी प्रशासन हीच काळाची गरज आहे. अन्यथा प्रत्येक आपत्तीनंतर पावसालाच दोष देत राहायचे आणि विकासाच्या नावाखाली होत असलेली उद्धस्तता मुकाटपणे स्वीकारायची, हेच आपल्या नशिबी येईल.

खरे तर पावसाळा आनंददायी असतो. कारण रखरखीत उन्हाळ्यामुळे ओके बोके झालेले रान पावसाच्या शिडकाव्यामुळे फुलते. झाडे बहरतात. निरनिराळ्या प्रकारच्या वेली कुंपणावर आणि झाडावर चढतात. त्यांनाही रंगीबेरंगी फुले येतात त्यामुळे वातावरणात आल्हाददायी रंग भरतो. जमीन गवताच्या रूपाने आणि वेली फुलांच्या रूपाने हिरवा शालू पांघरल्यासारखी दिसते. त्यातच जीवसृष्टी या सगळ्या हिरवळीला शोभा देते. पाऊस पडला की बेडकांची डराव डराव ऐकायला येते. फुलपाखरे बागडतांना दिसतात. वनस्पतीवर पोसले जाणारे जीव सगळीकडे दिसतात. कोरड्या झालेल्या नद्या वाहू लागतात अवखळ छोटे नाले नद्यांना मिळतात. असे एकूणच वातावरण मनाला भावणारे असते.कविवर्य ना.धों.महानोर म्हणतात त्याप्रमाणे चिंब पावसानं रान झालं आबादानी असे चित्र डोळ्याला सुखावते. परंतु पावसाच्या रौद्र रूपामुळे कवींनाही त्यातील सौंदर्य बघता येत नाही. पावसाची प्रतीक्षा सुरू असतानाच धो धो पाऊस आला आणि अर्ध्या महाराष्ट्रातील लोकजीवन उध्वस्त केले. त्यामुळे आनंदाच्या ऐवजी काळजीचे सूर ऐकू येऊ लागले. म्हणूनच विकासाचा फेरविचार करावा लागेल. तसे केले नाही तर निसर्गाची पाठराखण होणे शक्य नाही. निसर्गाचे रक्षण झाले नाही तर सर्वनाश निश्चित आहे. या पावसाने त्याकडे अंगुली निर्देश केलेला आहे.



## मतदार याद्यांचे विशेष पुनरीक्षण जिल्हाधिकारी विसपुतेंनी दिली घरभेट

**धुळे, दि. ७ जुलै, २०२६: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण () कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी धुळे शहरातील नटराज चित्रपट गृह, शांतीनगर परिसरात प्रत्यक्ष घरभेट देऊन मतदार पडताळणी प्रक्रियेची पाहणी केली. तसेच नागरिकांशी संवाद साधला.**

यावेळी अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, उपविभागीय अधिकारी रोहन कुवर , महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ ,अपर तहसीलदार वैशाली हिंगे, नगरसेवक प्रतीक कर्पे , छोटू थोरात, माजी महापौर प्रदीप कर्पे, जयश्री अहिरराव, मतदार नोंदणी अधिकारी किशोर कदम आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी नागरिकांशी संवाद साधत मतदार पडताळणी यादीसंदर्भात येणाऱ्या अडचणी, आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरण्याची प्रक्रिया तसेच मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर तपशील अद्ययावत करण्याबाबत माहिती जाणून घेतली. नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. त्यांनी नागरिकांना मतदार यादीत आपली नोंद अचूक असल्याची खात्री करून घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी तरुणींनी फॉर्म भरुन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्याकडे सुपूर्त केला.

तसेच संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मतदार पडताळणीचे काम अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याबरोबरच नागरिकांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे, बीएलओ यांनी पत्रकावर घर-गणना नंबर, सेन्सेक्स नंबर ( मॅपिंग ) टाकावा. बीएलओ यांनी दोन दिवसात यांनी शंभर टक्के काम पूर्ण करुन तात्काळ आपली माहिती अपलोड करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

## ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव

धुळे, दि.७ - श्री परशुराम युवा मंच व सखी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जुलै रोजी ब्राह्मण समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा भव्य गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. नवग्रह मंगल कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात समाजातील १०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या सोहळ्यास लातूर येथील ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी योगेश जांती, भाऊसाहेब प्रसादजी, प्रसाद जोशी, जयश वावदे, ड. प्रसाद देशमुख, तळेकर गुरुजी तसेच सखी मंचाच्या अध्यक्षा भारती जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह व पारितोषिके देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत सातत्य, मेहनत आणि गुणवत्तेच्या बळावर उच्च ध्येय गाठण्याचे आवाहन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सखी मंचाच्या सुषमा मोतीवाले, जागृती पंचभाई, अश्विनी जोशी, कल्याणी जोशी, पल्लवी पुराणिक, रेखा कुलकर्णी, वासंती दीक्षित, प्रणाली पंचभाई, भावना शेंद्रे, स्वाती राव यांच्यासह श्री परशुराम युवा मंचाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला समाजातील ज्येष्ठ नागरिक, पालक, महिला, युवक आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

* धुळे दि.७- शहरातील गांधी पुतळा ते श्री स्वामी समर्थ मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागतात. मनपाने खड्डे तात्काळ बुजवावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## जाहीर नोटीस


**तमाम लोकांना व जनतेस, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन मौजे आर्वी, ता.जि. धुळे क्षेत्र ला. ला. ४ हे. २८ आर. पो. ख. १ हे. ६५ आर. एकूण क्षेत्र ५ हे. ९३ आर. आकार ३ रु. ३१ पैसे यांस चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे या वर्णनाच्या शेतजमीनीचे सद्याचे ७/१२ उताऱ्यावरील व्यक्ती १) फारुख रउफ देशमुख, २) सुनंदाबाई शंकर हल्लोर (पाटील), ३) घनश्याम विश्वास शिंदे रा. आर्वी यांच्याशी आमचे पक्षकार श्री. सुभाष भगवान लोकरे रा. धुळे आणि श्री. नितीन विठ्ठल चौधरी रा. धुळे या धुळे न्यायालयात दावा क्रमांक ९४/२०१४ (लिजपेंडेंसी नोंदलेला) हा न्यायप्रविष्ट असल्याने सद्याचे ७/१२ उताऱ्यावरील मालक सदर शेतजमीन इतर त्रयस्थांना विकण्याच्या प्रयत्नात आहेत असे आमचे पक्षकारास खात्रीशीर माहित झाले आहे. तरी त्यांच्याशी कुणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करु नये केल्यास तो व्यवहार आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.**

**सदर नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.**

**स्थळ-धुळे,दि.- ०७/०७/२०२६.**

**ॲड.पुरुषोत्तम श्रावण महजन**
**धुळे मो.९८२३२१५४४०**

प्रकाश में आज पहेलीबार




बॉबी देवल, लारा दत्ता,
रितेश देशमुख, राहुल देव, तारा शर्मा

## कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेच्या कार्यशाळेचे कोळदे गावात आयोजन

**नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेबाबत जनजागृती करून पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नंदुरबार यांच्या वतीने दि.९ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता कृषी विज्ञान केंद्र, कोळदा येथे जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन असे आवाहन आत्माचे प्रकल्प संचालक दीपक एस. पटेल यांनी यांनी केले आहे.**

कृषी पायाभूत सुविधा निधी योजना आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत ऑगस्ट २०२० मध्ये सुरू करण्यात आली असून, कापणीनंतरच्या कृषी पायाभूत सुविधा तसेच सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेमुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक व विपणन यांना चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत आहे.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या रु. २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिली जाते. या योजनेंतर्गत गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट, कस्टम हायरिंग सेंटर तसेच इतर कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. योजनेचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहाय्यता गट तसेच कृषी क्षेत्रातील इतर पात्र संस्थांना घेता येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, कृषी उद्योजक तसेच इतर पात्र लाभार्थ्यांनी या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन योजनेचा लाभ घ्यावा, असेही आत्माचे प्रकल्प संचालक दीपक पटेल यांनी यांनी केले आहे.

## प्रशिक्षित कर्मचारीच सक्षम महसूल प्रशासनाचा पाया सहा महिन्यांत चारशे अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- महसूल प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक, नागरिकाभिमुख आणि तंत्रज्ञानसक्षेही करण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित महसूल विभागाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.**

जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ९ प्रशिक्षण सत्रांद्वारे महसूल विभागातील एकूण ४०२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध महसूल विषयक कायदे, कार्यालयीन कार्यपद्धती, डिजिटल प्रशासन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांच्या वापराबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणात ७७ सहाय्यक महसूल अधिकारी, ९४ महसूल सहाय्यक, १९९ ग्राम महसूल अधिकारी आणि ३२ मंडळ अधिकारी सहभागी झाले. पहिल्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या सत्रात प्रत्येकी ५०, दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात प्रत्येकी ३०, आठव्या सत्रात ४३ आणि नवव्या सत्रात ४९ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले.

अपर जिल्हाधिकारी गोगटे यांनी सांगितले की, पूर्वी नोकरीनंतरचे मूलभूत प्रशिक्षण केवळ १७ ते १८ कर्मचाऱ्यांनाच मिळाले होते, तर पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षणही अवघ्या १२ ते १३ कर्मचाऱ्यांपुरते मर्यादित राहिले होते. ही बाब लक्षात घेऊन नंदुरबार जिल्ह्यात प्रशिक्षणाची व्यापक मोहीम राबविण्यात आली.

या प्रशिक्षणात मामलतदार न्यायालय अधिनियम, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, जमीनविषयक कायदे, फेरफार, वारसनोंदी, माहितीचा अधिकार, सेवा हमी कायदा, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, ई-कार्यालय, ऑनलाइन प्रणाली तसेच एआय आधारित साधनांच्या वापरासह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणामुळे महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कायदेशीर, प्रशासकीय आणि तांत्रिक ज्ञान अधिक सक्षम होऊन नागरिकांना जलद, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्यास निश्चितच बळ मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

* धुळे दि.७- शहरासह जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली असल्याने ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचून डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. डासांमुळे होणाऱ्या आजारांपासून बचावा करीता महापालिकेने अबेटींग, फॉगिंग, फवारणी करण्याचा उपक्रम प्रभागनिहाय राबवावा. ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्न उपस्थित होणार नाही. जनतेच्या आरोग्याच्या हिताचा विचार करता मनपाने फवारणी,अबेटींग तात्काळ सुरू करावी अशी मागणी होत आहे.

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **ABDUL JABBAR SAYYAD KASIM KADRI** AND MY NEW NAME IS **ABDUL JABBAR SAYYAD KASIM**
ADD- HOUSE NO.3704 NEAR MASJID MOGLAI, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **SADRODDIN** AND MY NEW NAME IS **SADRODDIN KUTOBODDIN MANIYAR**
ADD- 17 NANDI ROAD NEAR HOUD SHIVAJI NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **SHABANA SAYYAD JABBAR KADRI** AND MY NEW NAME IS **SHABANA ABDUL JABBAR SAYYAD**
ADD- HOUSE NO.3704 NEAR MASJID MOGLAI, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **NILOFAR MAHMAD HANIFSHAH** AND MY NEW NAME IS **NILOFAR MAHAMAD HANIF SHAH**
ADD- RAM MANDIRA JVAL JUNEGAON MEHUNBARE JALGAON-424106 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **GAFURSHAHA GANISHAHA FAKIR** AND MY NEW NAME IS **GAFURSHAH GANISHAH FAKIR**
ADD- STATION MU POST SAVAI MUKTI MUKTI SAVAIMUKTI SINDKHEDA, DHULE-425407 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **ANSARI AAYESHA BANO KHALIL AHMAD** AND MY NEW NAME IS **AAYESHA BANO ABDUL RAZIQUE**
ADD- PLOT NO.21 VADJAI ROAD KABIR GANJ, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **ZAHEDA BI BASHEER AHMAD** AND MY NEW NAME IS **ZAHEDA BI BASHEER AHMAD ANSARI**
ADD- 2555 GHADIYAL MASJID VALIPURA, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **MUBARAK HUSAIN SHAKEEL AHMAD** AND MY NEW NAME IS **MUBARAK HUSAIN SHAKEEL AHMAD ANSARI**
ADD- VADJAI ROAD NEAR SATTAR KA BADA KABIR GANJ, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **IMRANKHAN JABBARKHAN** AND MY NEW NAME IS **IMRANKHAN JABBARKHAN MANIYAR**
ADD- MAOLVI GANJ 393, MAOULANA AAZAD ROAD, DHULE-424001 MAHARASHTRA

**NAME CHANGE**
MY PREVIOUS NAME WAS **M.ASLAM A.RASHID** AND MY NEW NAME IS **MOHAMMAD ASLAM ABDUL RASHEED ANSARI**
ADD- 0 VADJAI ROAD AZAD NAGAR, DHULE-424001 MAHARASHTRA

## आर.सी.पटेल इंग्लिश मेडीयममध्ये मान्सून रागा डे मोठ्या उत्साहात साजरा

**शिरपूर, दि.७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील वरुळ येथील आर.सी.पटेल इंग्लिश मेडीयम स्कूल मध्ये मान्सून रागा डे उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त संपूर्ण शाळा आकर्षक व पावसाळी सजावटीने सजविण्यात आली. सर्व शिक्षकांनी एकत्रितपणे सुंदर सजावट करून विद्यार्थ्यांसाठी आनंददायी वातावरण निर्माण केले.**




मुख्याध्यापिका सौ. सपना मराठे यांनी विद्यार्थ्यांना विविध ऋतूंची माहिती देत विशेषत: पावसाळा ऋतूचे महत्त्व, वैशिष्ट्ये आणि निसर्गातील बदल अतिशय सोप्या व मनोरंजक पद्धतीने समजावून सांगितले. विविध कविता, गाणी आणि कृतींच्या माध्यमातून मुलांना ऋतूंची आेळख करून देण्यात आली.

कार्यक्रम दरम्यान विद्यार्थ्यांसाठी पावसाळ्यावर आधारित विविध उपक्रम, खेळ आणि कृती घेण्यात आल्या. मुलांनी छत्री, रेनकोट, गमबूट आदी साहित्याचा वापर करून उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या आनंदी सहभागामुळे संपूर्ण वातावरण उत्साहाने भरून गेले.

सर्व शिक्षकांच्या सहकार्याने आणि उत्कृष्ट नियोजनामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांना आनंदासह ऋतूंविषयी उपयुक्त ज्ञान देणारा हा मान्सून रागा डे संस्मरणीय ठरला.










## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज नं.४६९/२०२६, नि.६

१) श्रीमती शैलाबाई अनिल पाटील, २) भुपेश अनिल पाटील,
नं.१ व २ रा.पाटील गढी, शिरपूर, जि.धुळे,
३) वैशाली प्रशांत भामरे, रा.मुंबई,
४) आरती नितीन शिंदे, रा.ढोकली ठाणे. ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

कै.अनिल भिमराव पाटील, मृत्यू दि.७/४/२०२५,
मुळ गाव रा.पाटील गढी, शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे. ....मयत

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविणे येते की,

अर्जदार याने म.दिवाणी न्यायाधिश सो., कनिष्ठ स्तर, शिरपूर, यांचे कोर्टात दिवाणी कि. अर्ज नं.४६९/२०२६ चा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८७२ कलम २ प्रमाणे वारस दाखलासाठी अर्ज केला आहे. अर्जदार नं.१ चे पती कै.क्रिष्णा उर्फ कृष्णा यादव माळी, मृत्यू दि.०६/२/२०२१, मुळ गाव रा.८४, भुपेश नगर, शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे येथे वृद्धापकाळाने मयत झाले आहेत. अर्जदार नं.१ पती शिरपूर, ता.शिरपूर, जि.धुळे येथील रहिवास असल्याने त्याचा वारस दाखला हा तसेच शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभासाठी गरजेचा होता. अर्जदार हिचे नावे लावणे कामी वारस दाखल्यासाठी अर्जदार हिने सदरचा अर्ज केला आहे.

याकामी कोणाचेही कोणतीही कायदेशीर तक्रार असल्यास मे.न्यायालयात दिनांक २१/७/२०२६ रोजी सकाळी ठिक. १०.३० वा. स्वत:किंवा वकिलामार्फत हजर राहून हरकत नोंदवावी. तसे न केल्यास मे.न्यायालयास योग्य तो पुढील आदेश करावा लागेल. याची नोंद घ्यावी. स्थळ- शिरपूर, दिनांक-७/०७/२०२६

आदेशावरून

**कनिष्ठ लिपीक** (शिक्का) **सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्याया. क.स्तर, शिरपूर** **दिवाणी न्याया. क.स्तर, शिरपूर**

# वंजारी महिला मंडळ गुणवंतांचा गौरव

नंदुरबार, दि.६ (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्हा वंजारी महिला मंडळाच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंताचा सत्कार समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी होत्या तर प्रमुख पाहुण्या म्हणून आदर्श शिक्षिका शकुंतला जायभाये उपस्थित होत्या. यावेळी गुणवंत विद्यार्थी समर्थ काकडे आणि कृतिका सांगळे यांनी तसेच पालकांच्या वतीने सुरेखा देविदास पेटकर यांनी मनोगत व्यक्त केले.

महिला मंडळाच्या अध्यक्षा अर्पणा पालवे यांनी आपल्या प्रास्ताविकातून महिला मंडळाने वर्षभरात राबविलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा आढावा घेतला. उपाध्यक्षा विद्या गाभणे यांनी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा व सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महिला मंडळाच्या कोषाध्यक्षा योगिता काकडे, ज्योती दापूरकर, कल्पना फटकाळ, वैशाली गीते तसेच उज्वला गंडे यांनी परिश्रम घेतले. आभार मनीषा शिंत्रे यांनी मानले.

# के.डी.महा.विद्या. शैक्षणिक साहित्याचे वाटप

रामपूर, दि.७ (प्रतिनिधी)- आदिवासी युवक क्रीडा विकास मंडळ संचलित के. डी.गावित माध्यमिक विद्यालय दरा (ता. शहादा) येथे आर.जी.फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय दप्तरे, चित्रकला वही व कलर साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास दरा गावाचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक अनिल चौधरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची प्रस्तावना उपक्रमशील शिक्षक मनीष चौधरी यांनी केली, तर आभार तारासिंग वळवी यांनी मानले. या उपक्रमासाठी लागणारा सर्व खर्च आर.जी.फाउंडेशनचे अध्यक्ष घनश्याम चौधरी व फाउंडेशनचे खजिनदार राजेंद्र सणस यांनी केला. तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शालेय साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी उपक्रमशील शिक्षक मनीष चौधरी यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या या कार्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व उपस्थित मान्यवरांनी त्यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त करत आर.जी. फाउंडेशन आणि सर्व सहकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.


## CHANGE OF NAME

I have Change
My name From Old Name
**ANSARI MD.AMMAR ABDUL GHAFFAR**
to My New Name
**ANSARI MOHAMMAD AMMAR ABDUL GHAFFAR**
as per Documents
ADD- PLOT NO.31, 80 FEET ROAD NEAR ANSAR MASJID ANSAR NAGAR, DHULE

## CHANGE NAME

My old name was
**HASEENA BI BINTE M. SHABAN**
and my new name is
**HASEENA BI ABDUL QAYYUM ANSARI**
Address:
353, Near Yakub Seth Factory, Moulvi Ganj, Dhule-424001

## CHANGE OF NAME

I have Change
My name From Old Name
**SHABNAM MUHAMMAD AMEEN**
to My New Name
**SHABNAM JUNAID AHMAD ANSARI**
as per Documents
ADD- 363-94 MAULVIGANJ NEAR SURAJ MILL GATE, DHULE

## CHANGE OF NAME

I have Change
My Name From Old Name
**IRAMNAAZ MOHAMMAD SHAWWAL**
to My New Name
**IRAM NAAZ MOHAMMAD AMMAR ANSARI**
as per Documents
ADD- PLOT NO.31, 80 FEET ROAD NEAR ANSAR MASJID ANSAR NAGAR, DHULE


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, वित्तीय संस्था, विशेष करुन कै. पंढरीनाथ धुडकू बागुल यांचे वारस हिंमतराव पंढरीनाथ बागुल व इतर यांना तसेच पुढील प्रमाणे नमूद मिळकतीबाबत हक्क, अधिकार असणाऱ्या वा सांगणाऱ्या हितसंबंधीतांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे धुळे ता. जि. धुळे येथील धुळे महानगरपालिका, हद्दीतील सि. स. क्र. १०१५ (एफ) ज्यासी क्षेत्र ५६.० चौ. मी. ज्यासी चतु:सिमा पुर्वेस : रोड, पश्चिमेस : बोळ रस्ता, दक्षिणेस : वापर रस्ता, उत्तरेस : विशाल बापू जगताप, माधव देवचंद जगताप यांचे घर येणे प्रमाणे मिळकत ही कै. पंढरीनाथ धुडकू बागुल यांचे मालकीची आहे.

मात्र, सदरहू मिळकत सि. स. नं. १०१५ (एफ) मध्ये आमचे पक्षकाराचा वडिलोपार्जित वाडवडीलांपासूनचा सुमारे ७० वर्षा पूर्वीपासूनचा कब्जा ताबा असून, सदर मिळकत विक्री घेण्याचा, खरेदी घेण्याचा आमचे पक्षकाराचा कायदेशीर अग्रहक्की अधिकार होता व आहे.

मात्र कै. पंढरीनाथ धुडकू बागुल हे मयत झाल्याने तसेच त्यांचे वारस हे सदरची मिळकत सि. स. नं. १०१५ (एफ) ही बेकायदा विक्री करण्याच्या तबदिल करण्याच्या प्रयत्नात असून, तसा करार करण्याचे तयारीत असल्याचे देखील आमचे पक्षकारास नुकतेच खात्रीलायक कळाले आहे.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकाराचा वर नमूद मौजे धुळे ता. जि. धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील सि. स. क्र. १०१५ (एफ) या मिळकतीत ७० वर्षापूर्वीपासूनचा कब्जा/ताबा असून हितसंबंध, हक्क व अधिकार असून, सदरहू मिळकत अग्रहक्काने खरेदी घेण्याचा आमचे पक्षकाराचा कायदेशीर अधिकार आहे, त्यासाठी आमचे पक्षकार लवकरच योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत. सबब इतर कोणीही त्रयस्थ इसमांनी वर नमूद मिळकतीसंबंधी कोणत्याही प्रकाराचा तबदिलीचा किंवा खरेदी विक्री, गहाण, दाण, तारण इ. इ. कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यास दिली असे. धुळे दि. ०६/०७/२०२६

**अॅड.आनंद ज्ञानेश्वर कुलकर्णी** मो.९४२३४५२२५५
प्लॉट नं. ४, गुरुदत्त कॉलनी, हिरे भवनच्या बाजुला, धुळे-.४२००१.

## जाहीर नोटीस

श्री.विठ्ठलराव सी.पथारीया
अॅडव्होकेट शहादा
दि. ४/७/२०२६

### शहादा येथील म. दिवाणी न्यायाधीश साहेब (व/क स्तर) यांच्या न्यायालयात

दि. कि. अर्ज नं. २६४/२०२६

**श्री. विनायक भरत बोरसे,** वय : ३६, धंदा : शेती,
रा. कळंबू ता. शहादा जि. नंदुरबार ... अर्जदार

।। विरुद्ध।।

**कोणीही नाही** ...सामनेवाला
**कै.रेखाबाई भरत बोरसे,**
(मृत्यू : २७/०९/२०१९) ... मयत

**अर्ज : दि बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चॅप्टर VII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी**

या जाहीर नोटीसद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. रेखाबाई भरत बोरसे हे दिनांक २७/०९/२०१९ रोजी कळंबू ता. शहादा जि. नंदुरबार येथे मयत झाले असून ते कळंबू ता. शहादा जि. नंदुरबार येथील रहिवासी होते. त्यांचे कायदेशीर वारस.

१) संदीप भरत बोरसे, वय : ३८ वर्षे, -मुलगा
२) श्री. विनायक भरत बोरसे, वय : ३६ वर्षे, -मुलगा

हे त्यांचे मृत्यूनंतर शासकी निमशासकीय कामी कायदेशीर वारस लावण्या करीता सदरचा अर्ज म. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जाचे कामी दि. १०/८/२०२६ रोजी पुढील चौकशीसाठी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जाबाबत वर नमूद वारस हे कै. रेखाबाई भरत बोरसे यांचे वारस म्हणून अर्जदाराच्या नावाने वारस दाखला मिळण्याबाबत कोणाचीही काही हरकत असल्यास अगर अधिकार असल्यास त्यांनी चौकशीच्या दिवशी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलामार्फत म. दिवाणी न्यायाधीश सो. व/क. स्तर शहादा जि. नंदुरबार यांचे कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी. सदर दिवशी चौकशीचे कामी कोणाचीही काही हरकत नसल्यास चौकशीचे कामकाज पूर्ण होवून अर्जाचा निकाल दिला जाईल कळावे..

आज तारीख ४/७/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी सदरची नोटीस दिली आहे. आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (कोर्टाचा शिक्का) **अधीक्षक** म. दिवाणी न्यायालय व. स्तर शहादा जि. नंदुरबार


## Walk-in-Ineterview

**Required**
**Principal**
**Qualifications: B.A./M.A./B.Sc./ M.Sc., B.Ed./M.Ed., D.S.M.**
**Walk-in-Interview**
**Date: 10th July, Time: 10:00 AM**
Please bring your resume along with you.
**Contact: 9421451818/9325322537**
**N.E.S.'s English Medium School**
Behind Sinchan Bhavan, Sakri Road, Dhule


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतीयांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) तु.जि.धुळे, पो.तु.ता.धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे महिंदळे ता.जि.धुळे हद्दीतील गट क्रमांक १२८/१ (सिटी सर्व्हे नं.६३) पैकी प्लॉट नं.१५ यांसी क्षेत्र १५० चौ.मी. सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- प्लॉट नं.१४, | पश्चिमेस- प्लॉट नं.१६, |
| दक्षिणेस- रस्ता, | उत्तरेस- प्लॉट नं.२०. |

२) प्लॉट नं.१६ यांसी क्षेत्र १५० चौ.मी. सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- प्लॉट नं.१५, | पश्चिमेस- प्लॉट नं.१७, |
| दक्षिणेस- रस्ता, | उत्तरेस- प्लॉट नं.१९ |

३) प्लॉट नं.१७ यांसी क्षेत्र १५७.५ चौ.मी. सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- प्लॉट नं.१६, | पश्चिमेस- रस्ता, |
| दक्षिणेस- रस्ता, | उत्तरेस- प्लॉट नं.१८ |

४) प्लॉट नं.१८ यांसी क्षेत्र १५७.५ चौ.मी. सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- प्लॉट नं.१९, | पश्चिमेस- रस्ता, |
| दक्षिणेस - प्लॉट नं.१७, | उत्तरेस- रस्ता. |

५) प्लॉट नं.१९ यांसी क्षेत्र १५० चौ.मी. सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- प्लॉट नं.२०, | पश्चिमेस- प्लॉट नं.१८ |
| दक्षिणेस- प्लॉट नं.१६, | उत्तरेस- रस्ता |

६) प्लॉट नं.२० यांसी क्षेत्र १५० चौ.मी. सदरील प्लॉट मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- प्लॉट नं.२१, | पश्चिमेस- प्लॉट नं.१९, |
